नियमित दिवाणी दावा क्र. १०७१/२०१५
<u>बाळकृष्ण वि. सुधाकर आणि ईतर</u>

## <u>नि.क्र. २१ वरील आदेश</u>

१. वादीतर्फे दाव्यामध्ये दुरुस्तीचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार वादीने दावा दाखल केल्यानंतर मिळालेल्या माहितीनुसार प्रतिवादी क्र. ४ चे नाव लिहीण्यात आले होते. परंतु अनेक प्रयत्न करुनही प्रतिवादी क्र. ४ यांची बजावणी होवू शकली नाही. त्यानंतर वादीला, प्रतिवादी क्र. ४ चे नाव व पत्ता याबाबत माहिती मिळाली. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ चे नावात बदल होणे आवश्यक आहे. म्हणून सदरचा अर्ज प्रतिवादीने दाखल केला आहे.

२. पुरेशी संधी मिळूनही प्रतिवादीने आपले म्हणणे दाखल केले नाही.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी यांचे वतीने युक्तीवाद ऐकला.

४. सदरचा दावा हा साठेखतावरुन खरेदीखत मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्यामध्ये दिलेल्या कथनाशी सुसंगत आणि स्पष्टीकरण देणारी आहे. प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून वरील कारणमिमांसेअंती मी या मतास आलो की प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्याचे सर्व वादमुद्दे निकाली काढण्यासाठी आवश्यक व गरजेची आहे. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे:

## <u>आदेश</u>

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करुन त्याच्या प्रती दाव्यात दाखल कराव्यात.

Digitally signed by JAHANGIR RASHEED PATHAN
Date: 2022.10.18 11:42:10 +0530

(ज. र. पठाण)

दिनांक : १७/१०/२०२२ ३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बार्शी.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order/ Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

Name of Stenographer :- S. V. Kokate (Grade III)

Court :- J.R. Pathan,3rd Jt. CJJD & JMFC, Barshi.

Order signed by the Presiding Officer on :- 17/10/2022

Order uploaded on :- 18/10/2022